जा.क्र.अपोमसं(वा)/४५/नियो/रस्ता सुरक्षा अभियान-२०१५/पुरस्कार/२०१४/२५५७ मुंबई. दि.:-०७/१०/२०१४

कार्यालय / Office of the
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य
Additional Director General of Police (Traffic) Maharashtra
जुने जकात घर, ४ था मजला, डि. डि. इमारत,
शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई - ४०० ०२३.
Old Custom House, 4th Floor, D. D. Bldg.,
S. B. Marg, Mumbai - 400 023.

प्रति,

मा.कुलगुरू,

........................

........................

........................

विषय :- विद्यापिठ स्तरावर "रस्ता सुरक्षा" विषयक कार्यक्रम राबविण्याबाबत परिपत्रक......

---

"रस्ता सुरक्षा अभियान राज्यस्तरीय पुरस्कार"

(१) पुरस्काराचे स्वरूप :-

(I) राज्यस्तरीय पुरस्कार :-

हे पुरस्कार शासनाच्या मंजूरीच्या अधीन राहुन अदा केले जातील.

(II) पुरस्काराच्या अटी/नियम व गुण विभागणी :-

१) विद्यापीठ अंतर्गत सर्वच महाविद्यालयांनी रस्ता सुरक्षा अभियानामध्ये योगदान देणे अपेक्षित आहे.
२) सर्वच विद्यार्थ्यापर्यंत अभियानाची संकल्पना पोहचणे अपेक्षित आहे.
३) जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणा-या विद्यापीठांना अधिकचे गुण.

(III) गुणाचे निकष :-

अ) प्रत्यक्ष रस्ता सुरक्षा अभियानामधील उपक्रम जास्तीतजास्त ४० गुण उदा. पथनाटय, घोषवाक्य / प्लेकार्डस धरुन रस्त्याच्या दुतर्फा/ गर्दीच्या ठिकाणी/रेल्वे स्टेशन/बस स्थानक येथे जनजागृती

ब) रस्ता सुरक्षा या विषयावर निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वादविवाद स्पर्धा घेवून जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणे ३० गुण.

क) सर्वसामान्य चालक व नागरीकामध्ये रस्ता सुरक्षा या विषयी जनजागृतीकरीता केलेले प्रयत्न २० गुण.

ड) विद्यापीठाने आयोजित केलेल्या / महाविद्यालयाने आयोजित केलेल्या युवा महोत्सवामध्ये रस्ता सुरक्षा बाबतीत एका विषयावर स्पर्धा. जास्तीतजास्त २० गुण.

इ) अपघात घडल्या नंतर प्रत्यक्ष जखमींना सहाय्य किंवा प्रथोमचार याबाबत केलेली मदत.जास्तीतजास्त २० गुण.

ई) जनसमुदाया मध्ये व्याख्यानाव्दारे प्रचार आणि प्रसार. जास्तीतजास्त २० गुण.

उ) रोड-शो (हयुमन रॅली) शोभा यात्रा, पथनाटय सादरीकरण इ. जास्तीतजास्त २० गुण.

ऊ) विद्यापीठ स्तरावरील उपक्रम. जास्तीतजास्त २० गुण.

ए) सुबक, आकर्षक पुरस्कार प्रस्तावास. जास्तीतजास्त १० गुण.

ऐ) कार्यशाळेचे आयोजन (संघ नायक, कार्यक्रम अधिकारी, लोकप्रतिनिधी जास्तीतजास्त २० गुण.

इ) आर. टी. ओ. कार्यालया मार्फत वाहन चालविण्याचा परवाना मिळवून देण्याबाबतची कार्यशाळा/शिबीर जास्तीतजास्त १० गुण.

ओ) विद्यार्थी व पालक कार्यशाळेमध्ये रस्ता सुरक्षा बाबत जाणिव जागृती जास्तीतजास्त **१० गुण.**

अं) नाविण्यपूर्व उपक्रम **१० गुण.**

अः) ज्या विद्यापीठामार्फत जास्तीतजास्त महाविद्यालये, जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होतील अशा विद्यापीठांना व महाविद्यालयांना जास्तीतजास्त **५० गुण.**

**'' अभियानाची सुरुवात आणि प्रस्ताव सादरीकरनाची तारीख''**

१) **अभियानाची सुरुवात/कालखंडः-** दिनांक ०१ ऑगस्ट २०१४ ते ३१ डिसेंबर २०१४.

२) स्पर्धा महाविद्यालयीन स्तरावर असून महाविद्यालयाच्या पुरस्कारा बरोबरच त्या विद्यापीठाला मानाचा करंडक (फिरता)

३) **निवड प्रक्रिया जिल्हा स्तरावर पहिल्या दोन महाविद्यालयांचे प्रस्ताव विद्यापीठाकडे शिफारस यासाठी निवड समिर्त पुढील प्रमाणेः-** समितिने १० डिसेंबर, २०१४ पर्यत प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविणे.

१) विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवायोजनेचे समन्वयक - अध्यक्ष
२) प्रतिथयश राष्ट्रीय सेवायोजनेचे समन्वयक
३) प्रतिथयश सामाजिक कार्यकर्ता
४) जिल्हा पोलीस वाहतूक विभागातील प्रतिनिधी.
५) जिल्हा समन्वयक, - सचिव (रा. से. यो.)

**(४) विद्यापीठ स्तरीय समिती :-** प्रत्येक जिल्हयातुन जिल्हा समितीने शिफारस केलेल्या प्रस्तावाची छानणी करुन पहिल्य दोन प्रस्तावाची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी शिफारस करताना विद्यापीठने/विद्यापीठाच्या अधिकारात पुरस्कार देऊ शकतात विद्यापीठ समितीने हे पुरस्कार राज्य समिती/ वाहतूक विभाग यांचेकडे २० डिसेंबर पर्यत सादर करावेत. सादर करतान प्रस्तावाच्या गुणांसहित संक्षिप्त तक्ता करुन पाठवावेत.

१) मा. कुलगुरु - अध्यक्ष
२) मा. विभागीय उपसंचालक, उच्च शिक्षण
३) मा. सामाजिक कार्यकर्ता
४) मा. कुलसचिव
५) मा. विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनाचे समन्वयक - सचिव

**(५) राज्यस्तरीय निवड समितीः-**

सर्वच विद्यापीठाकडून शिफारस केलेल्या पुरस्काराची छानणी करणे व पुरस्काराची नांवे घोषित करणे.

१) मा. अपर पोलिस महासंचालक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य ) - अध्यक्ष.
२) मा. कुलगुरु
३) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन.
४) मा. राज्य संपर्क अधिकारी, रा. से. यो. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, एल्फीस्टन तांत्रीक विद्यालय परिसर,धोबी तलाव, मुंबई.
५) मा. पोलिस अधिक्षक, महामार्ग पोलीस, - सचिव

ADDL. DIRECTOR GENERAL OF POLICE (TRAFFIC) M. S. MUMBAI

(बाळासाहेब पाटील)
पोलीस अधीक्षक,(मुख्या.)
अपर पोलीस महासंचालक (वा.)
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे करिता.

# विद्यापिठांची यादी.

१) मा.कुलगुरू, मुंबई विद्यापिठ, मुंबई.

२) मा.कुलगुरू, पुणे विद्यापिठ, पुणे.

३) मा.संचालक, आय.आय.टी., पवई, मुंबई.

४) मा.कुलगुरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ, औरंगाबाद.

५) मा.कुलगुरू, भारती विद्यापिठ, पुणे.

६) मा.कुलगुरू, पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील विद्यापिठ, नवी मुंबई.

७) मा.कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापिठ, नागपूर.

८) मा.कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ, अमरावती.

९) मा.कुलगुरू, शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर.

१०) मा.कुलगुरू, एस.एन.डी.टी. महिला विद्यापिठ, मुंबई.

११) मा.कुलगुरू, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापिठ, नांदेड.

१२) मा.कुलगुरू, सिम्बॉयसिस आंतरराष्ट्रीय विद्यापिठ, पुणे.

१३) मा.कुलगुरू, टिळक महाराष्ट्र विद्यापिठ, पुणे.

१४) मा.कुलगुरू, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ, नाशिक.

१५) मा.कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ, जळगांव.

१६) मा.कुलगुरू, आरोग्य विज्ञान विद्यापिठ, नाशिक.

१७) मा.कुलगुरू, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठ, अकोला.

१८) मा.कुलगुरू, महात्मा फुले कृषी विद्यापिठ, राहुरी.

१९) मा.कुलगुरू, मराठवाडा कृषी विद्यापिठ, परभणी.

२०) मा.कुलगुरू, बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठ, दापोली, रत्नागिरी जिल्हा.

२१) मा.कवी कुलगुरू, संस्कृत विद्यापिठ, रामटेक, नागपूर

२२) मा.कुलगुरू, हिंदी आंतरराष्ट्रीय विद्यापिठ, वर्धा.

२३) मा.कुलगुरू, मत्स व पशुविज्ञान विद्यापिठ, नागपूर.

२४) मा.कुलगुरू, बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापिठ, लोणेरे, रायगड.

२५) मा. संचालक, शालेय शिक्षण विभाग, पुणे, (+ २स्तर पुणे) सेंटर बिल्डींग, पुणे.

२६) मा. संचालक, व्यवसाय व प्रशिक्षण विभाग, एल्फीस्टन टेक्नीकल बिल्डींग, महापालिका मार्ग -३, मुंबई.

२७) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचलनालय, एल्फीस्टन टेक्नीकल बिल्डींग, महापालिका मार्ग -३, मुंबई.

२८) मा. कुलगुरू, गोंडवाणा विद्यापिठ, गडचिरोली.